तुह्मांप्रत । नका करूं काळजी ॥ १२३ ॥ अल्ला इलाही श्रीराम । देईल तुह्मां सौख्यधाम । पुरवील तुमचे कोड काम । वचन माझें प्रमाण हें ॥ १२४ ॥ सीतावेदरे आण चित्तीं । ही बाबांची थोर महती । चाल त्यांच्या दर्शनाप्रती । वंदन करूं पायांचें ॥ १२५ ॥ त्यांच्या भक्तांच्या खेटराची । सरीही न ये आपणां साची । परी बाबा माय अनाथांची । तारण आपुलें करील ॥ १२६ ॥ आज बाबांचे जमले भक्त । चांदोरकरादि हरीपंत । बाबांनीं आपुल्या भक्तांप्रत । केली आहे मेजवानी ॥ १२७ ॥ ज्ञानवैराग्य आणि भक्ती । हींच पक्वान्नें निश्चितीं । करून आपल्या भक्तांप्रती । जेवा ह्मणती यथेच्छ ॥ १२८ ॥ जें जें रुचेल जयाशीं । तें तें त्याणें सेवणें ऐसी । ताकीद आपुल्या भक्तांसी । बाबा करिती चाल सिते ॥ १२९ ॥ आपण उभयतां कुत्र्यापरी । त्या समर्थाच्या राहूं द्वारीं । एखादा तो तुकडा तरी । फेंकील आपणांकडे गे ॥ १३० ॥ तोच पुरेल आपणांशीं । कृतार्थ वेडे करण्याशीं । चाल पर्वणी पुन्हां ऐशी । नाहीं कधीं येणार ॥ १३१ ॥ शताश्वमेधाचें पुण्य । येथेंच मिळेल तुह्मां लागून । या अध्याया केल्या पठन । एक वेळही श्रोते हो ॥ १३२ ॥ ही साईची अध्यायत्रयी । सरस्वती गंगा यमुना पाही । हेंच प्रयाग सांगूं काई । भावार्थांत बुडी घ्या ॥ १३३ ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत । वदलों यथामती सत्य । हे तारक भक्तांप्रत । होवो ह्मणे दासगणू ॥ १३४ ॥ श्रीहरिहरार्पणमस्तु ॥ शुभंभवतु ॥

## इति त्रयस्त्रिंशोऽध्यायः समाप्तः

302

# श्री संतकथामृत

श्री दासगणूकृत

## अध्याय ५७ वा

श्री गणेशायनमः ॥ हे चित्स्वरूप लंबोदरा । आद्यमूर्ती उदारा । धरून सत्वर माझ्या करा । ग्रंथलेखन करवावें ॥ १ ॥ ऐका श्रोते समस्त । हा संतकथामृत नामें ग्रंथ । साक्षात्तु वसंत । संतकथा या आम्रतरू ॥ २ ॥ चमत्कार फांद्या सोज्ज्वळ । पद्यरचना पर्णें कोमळ । बोधरूपी आलें फळ । तें सेविण्या कोकिळ व्हा ॥ ३ ॥ हा ग्रंथ मानस सरोवर । पद्यरचना हेंच नीर । संतकथा कमलें थोर । या कांसारीं विकासलीं ॥ ४ ॥ बोधरूपी मकरंद । या कमळीं असे शुद्ध । तो सेविण्यासी मिलिंद । व्हा हो तुम्ही अवघे ॥ ५ ॥ मागें भक्तलीलामृत ग्रंथांत । जे मी वर्णिले साईनाथ । एकतीस बत्तिस तेहतिसांत । शिर्डी ग्रामीं वास ज्यांचा ॥ ६ ॥ तो भक्तांचा कल्पतरू । तो भवार्णवीचा होय तारू । महा उदार दया-सागरू भक्तवत्सल ज्ञाननिधी ॥ ७ ॥ त्या समर्थाचे दर्शनासी । पातले तद्भक्त शिर्डीसी । धन संक्रमणीं पौषमासीं । उत्तम पर्व लक्षूनिया ॥ ८ ॥ येथें शंका येईल मनीं । कीं धन संक्रांतमकराहूनी । श्रेष्ठ नसतां पर्वणी । कां हे भक्त मिळाले ॥ ९ ॥ परी पहा धन-संक्रांती । येतां जन सुप्रभातीं । नैवेद्य दाऊन सूर्याप्रती । प्रभातीं करिती भोजनें ॥ १० ॥ तोच प्रकार येथींचा । असे जाणा श्रोते साचा । उलगडा करून तयाचा । सांगतों तुम्हा कारणें ॥ ११ ॥ अनुतापरूपी वाजली थंडी । भावरूप घालून बंडी । आले भक्त तांतडी । सद्गुरूसी भेटावया ॥ १२ ॥ शिर्डी उदयगिरी थोर । साई महाराज हा दिनकर । तेथें उदेला निर्धार । म्हणून भक्त मिळाले ॥ १३ ॥ साईकृपा ही प्रभात । श्रद्धारूप गंगेंत । स्नानें करून अवघे भक्त । गेले साई दर्शना ॥ १४ ॥ तो समर्थांनीं मांडलें पान । भक्तांसीं द्याया

भोजन। करूनियां पक्वान्न। उत्तम आत्मज्ञानाचें ॥ १५ ॥ हाचि तेथींचा धनुर्मास म्हणून या पर्वणीस। भोजनाची करून आस। आले भक्त धांवोनिया ॥ १६ ॥ गोविंदात्मज नारायण। धीर उदार सज्जन। चांदोरकुलीं जन्म जाण। झाला जयाचा कल्याणीं ॥ १७ ॥ तो आणि हरिपंत। महाकर्मठ शुचिर्भूत। वेद मार्गी अत्यंत। निष्ठा असे जयांची ॥ १८ ॥ बेरे नाना निमोणकर। लक्ष्मण मारुती इतर। भक्त जमले थोर थोर। किती म्हणून सांगावें ॥ १९ ॥ अवघे बसले मशिदीसी। हर्ष अत्यंत मानसी। जैसें पाहून जननीसीं। आनंदती लेंकुरें ॥ २० ॥ तैं म्हणती चांदोरकर। जोडून आपुले दोन्हीं कर। गा सकट त्रिवार। प्रश्न आम्हीं केला तुम्हां ॥ २१ ॥ त्याचें न दिधलें उत्तर। कां राग आमचेवर। आज सांगा परमेश्वर। कोण कैसा कोठें असे ॥ २२ ॥ महाराज म्हणती त्यावरी। नाना राग न माझ्या अंतरीं। तुम्ही माझीं मुलें सारीं। मी कोपूं कोणावर ॥ २३ ॥ मीं स्थान तुम्हां रूसण्यातें। श्री व्यंकुशहा जरी असते। तरी मशीं स्थान होतें। तुम्हासारिखें रुसावया ॥ २४ ॥ असो मागें तुम्हांलागून। म्यां जे अध्याय कथिले दोन। त्यांचें आधीं करून स्मरण। अवधान द्यावें मद्बोला ॥ २५ ॥ नाना त्या द्वय अध्यायीं। जें मी ज्ञान कथिलें पाही। तें सेविल्या अंगीं येई। साधन चतुष्टयसंपन्नता ॥ २६ ॥ साधन चतुष्टयसंपन्न। जेव्हां होतो शिष्य जाण। तेव्हांच कथावें ब्रह्मज्ञान। उद्धार त्याचा व्हावया ॥ २७ ॥ सिद्धवस्तु साधावया। ज्या ज्या योजिती उपाया। त्याचें नांव ये ठायां। साधन ऐसें जाणिजे ॥ २८ ॥ तीं साधनें आहेत चार। नामें ऐक क्रमवार। चित्त करूनियां स्थिर। आहे विषय गहन हा ॥ २९ ॥ नित्यानित्य वस्तु विवेक। दुसरें तें वैराग्यदेख। तिसरें शमदमादि षटक। चौथें जाण मुमुक्षुता ॥ ३० ॥ नित्यानित्यवस्तु विवेकाची। व्याख्या ऐक आतां साची। पाहिजे भावना मनींची।

कीं ब्रह्मसत्य जगमिथ्या ॥ ३१ ॥ नित्यानित्य वस्तु विवेक । बाणलें मनीं हें दावण्या देख । नाना खटपटी दांभिक । करूनि जना भोंदिती ॥ ३२ ॥ कोणी होऊन वारकरी । खेपा घालिती पंढरपुरीं । परी एकही न जाणे हरि । कोण कैसा कोठे असे ॥ ३३ ॥ तीही न वारी श्रद्धायुक्त । केवळ मान मिळावा जगतांत । हाच हेतु असे सत्य । त्या वारीच्या मुळाशीं ॥ ३४ ॥ नानाग्रंथ भाराभर । करूनियां पाठांतर । परी स्वतांचें न शुद्ध अंतर । उपदेश मात्र करिती परा ॥ ३५ ॥ ते ज्ञानरूपी सरोवरांत । दर्दुरजाण निश्चित । वादरूपी चिखलाप्रत । सेवून टाकिती मकरंदा ॥ ३६ ॥ परनिंदा ज्याचे मुखीं । आपलीच मिरविती शेखी । ते न जाणावे विवेकी । अयोग्य ब्रह्म ज्ञानातें ॥ ३७ ॥ इहपरलोकींच्याविषयाची । आशा न ज्यास उरली साची । तीच मूर्ति वैराग्याची । नाना जाण निश्चयें ॥ ३८ ॥ शम दम तितिक्षा उपरती । श्रद्धा समाधान यां म्हणती । शमादी षट्क बोलती । ज्ञाते पुरुष चांदोरकरा ॥ ३९ ॥ मनोनिग्रह विषयां ठायीं । याचें नांव शम पाही । ऐक दमाची व्याख्याही । सावधान चित्तानें ॥ ४० ॥ विषयीं गेलिया वासना । बलात्कारें आवरिती मना । त्या आवरण्याप्रती नाना । दम ऐसें म्हणावें ॥ ४१ ॥ निज प्रारब्धें करून । प्राप्त झालिया दुःख जाण । तें आक्रोशा वांचून । सहन करणें ती तितिक्षा ॥ ४२ ॥ मायाजाळीं न गुंते चित्त । कनक कांता सुत आप्त । हें मानणें मिथ्या भूत । याचें नांव उपरती ॥ ४३ ॥ विश्वास युक्त असणें मन । याचेंच नांव श्रद्धा जाण । आतां राहिलें समाधान । त्याचें विवरण ऐकावें ॥ ४४ ॥ समान सुख दुःखें मानी सारीं । तळमळ मुळीं न अंतरीं । स्थिर चित्त शैलापरी । याचें नांव समाधान ॥ ४५ ॥ मनीं मोक्ष इच्छा बळकट । त्या व्यतिरिक्त मानी वीट । अपरोक्ष ज्ञानाची जो वाट । हुडकीतसे तो मुमुक्षु ॥ ४६ ॥ मुमुक्षुपणाची पात्रता । अंगीं असणें तत्वतां । याचें नांव मुमुक्षुता ॥

निश्चयें करून जाणावें ॥ ४७ ॥ आतां मोक्ष म्हणजे न वैकुंठ । मोक्ष म्हणजे न कैलासपेठ । आहे फार अवघड वाट । चांदोरकरा या मोक्षाची ॥ ४८ ॥ जगाचें जें आदिकारण । जें अविनाश शुद्ध चैतन्य । त्या वस्तूसी तादात्म्य होणें । याचें नांव मोक्ष पहा ॥ ४९ ॥ त्या अविनाश मोक्ष पदासी । जाणें हाचि पुरुषासी । पुरुषार्थ नाना निश्चयेसीं त्यावीण अवघें वोखटें ॥५०॥ ऐसी ऐकितां समर्थवाणी । चांदोरकर जोडोनि पाणी । बोलते झाले लीन वचनीं । तें शुद्ध चैतन्य कैसें असे ॥ ५१ ॥ जें जगाचें जगदाधार । जें व्यापून उरलें चराचर । ज्याचेंच ठायीं अखेर । लय होणार जगताचा ॥ ५२ ॥ ऐसें जें का आद्यमूळ । तेंच चैतन्य सोज्वळ । जगत जें दिसतें निवळ । तो भास जाण नारायणा ॥ ५३ ॥ तें चैतन्य आहे ऐसें । हा निश्चय ना करवत असे । मात्र क्षण क्षणा येत असे । साक्ष असणेपणाची ॥ ५४ ॥ जेथें न व्यापक चैतन्य । ऐसें न मुळी जगीं स्थान । एकही वस्तु त्यावीण । गवसे न शोधूं गेलिया ॥ ५५ ॥ वस्तु निर्देश होण्यासी । चैतन्य मात्र म्हणावें त्यासी । बाकी वत्सा तयासी । नाम रूप कांहीं नसे ॥ ५६ ॥ जैसा कां हा प्रभंजन । रंग रूपातीत जाण । तैसेंच आहे चैतन्य । हें कदाही विसरूं नको ॥ ५७ ॥ त्या चैतन्या ब्रह्म म्हणती । तदोपासना ज्ञाते करिती । ऐशा उपासका या जगतीं । ब्रह्मवेत्ते म्हणतात ॥ ५८ ॥ वृक्ष कोटी प्राणी कोटी । जीव कोटी जंतु कोटी । एक चैतन्याच्या पोटीं । अवघे जाण सामावे ॥ ५९ ॥ दृश्य ज्ञेय भासमान । या अवघ्यासी आद्यकारण । नाना एक चैतन्य । किती सांगू तुजप्रती ॥ ६० ॥ तें चैतन्य सर्व व्यापक चैतन्य क्लेश रहित देख । तें सत्यज्ञानरूप एक । आनंदरूप तेंच कीं ॥ ६१ ॥ हे अवघे आपण । त्यापासून नाहींत भिन्न । त्या चैतन्या लागून । ब्रह्म ऐसें म्हणावें ॥ ६२ ॥ तें चांदोरकर जोडून हात । म्हणती हे सद्गुरुनाथ । ब्रह्म सर्वव्यापक

क्लेश रहित। आनंदरूप एक म्हणतां ॥ ६३ ॥ आणि तेंच ब्रह्म सर्वांठायीं। नटलें म्हणतां माझे आई। येथे मजला शंका येई। त्याचें करा निरसन ॥ ६४ ॥ जग अवघें क्लेश युक्त। तैसेंच आहे अनंत। चैतन्याचे गुण त्यांत। कांहीं न येती प्रत्यया ॥ ६५ ॥ जो अंध जन्मापासून। तो कैसा पाहिल लावण्य। तैसें सत्य चैतन्य। मिथ्यामाजीं राहे कसें ॥ ६६ ॥ आत्माच चैतन्य लेखितां। तदैकत्व गुरूनाथा। नष्ट होईल सर्वथा। कां कीं आत्मे अनेक ॥ ६७ ॥ आत्म्याचें सुखदुःखभान। न होय अन्योन्या लागून। मग अवघ्यांत एक चैतन्य। आहे कैसें म्हणावें ॥ ६८ ॥ जैसीं शरीरें भिन्न भिन्न। तैसेंच आत्मे भिन्न भिन्न। आत्मा चैतन्यापासून। वाटे असावा निराळा ॥ ६९ ॥ तैं म्हणती साईनाथ। चुकतोस तूं नाना येथ। आतां करून स्वस्थ चित्त। अवधान द्यावें मब्दोला ॥ ७० ॥ पहा ताम्र शुभ्र काळा। मिश्र रंग निळा पिंवळा। किरमिजी हिरवा जांभुळा। पृथक्‌ टाकिले पाण्यांत ॥ ७१ ॥ मग त्याचे भरून पेले। ठेविले वेग वेगळाले। म्हणून कां होतें निराळें। उदक वेडया ते ठायीं ॥ ७२ ॥ ताम्रसंगें ताम्र जाण। बैसलें ताम्र होऊन। पिंवळ्यासंगें पीलपण। आलें नाना उदकासी ॥ ७३ ॥ मग तें घेऊन मिश्रण। केलिया त्याचें पृथक्करण। पिंवळेंपण हिरवेंपण। नष्ट होईल उदकाचें ॥ ७४ ॥ तैसें आत्माहृदय होतां एक। प्रतीतीस येती सुखदुःख। हृदयें मात्र अनेक। आहेत नाना मानवांचीं ॥ ७५ ॥ परी आत्म्याचा न भेद तेथ। तो अवघ्यांचा एकची एक सत्य। सुखदुःखेंहीं तो खचित। आहे धर्म हृदयाचा ॥ ७६ ॥ परी हृदयास येण्या हृदयपण। आहे आत्म्याची अपेक्षा जाण। आत्मा तोच चैतन्य। वोळख वत्सा तयासी ॥ ७७ ॥ आतां नाना तुमची। करावया समज साची। फोड करून या विषयाची। सांगतों तें ऐकावें ॥ ७८ ॥ चैतन्य आहे त्रिगुणात्मक। पारमार्थिक व्यवहा-

रिक। आणिक पहा प्रतिभासिक। हे वत्सा नारायण ॥ ७९ ॥ जैसा एकचि देहजाण। भोगितो अवस्था तीन। वृद्ध तारूण्य बाळपण। तोचि प्रकार येथींचा ॥ ८० ॥ पारमार्थिक चैतन्याची। ज्या आत्म्या आली साची। योग्यता नाना तयाची। होत गणना साधूंत ॥ ८१ ॥ जे सशास्त्र करिती वर्तन। त्याज्या त्याज्य जाणून। त्या आत्म्यालागून। व्यावहारिक म्हणावें ॥ ८२ ॥ जे असत्या सत्य मानिती। जे अज्ञानपटलें झांकले असती। नाना ऐशा आत्म्याप्रती। प्रतिभासिक म्हणावें ॥ ८३ ॥ प्रतिभासिक तें अज्ञान। व्यावहारिक ते सज्जन। पारमार्थिक ते संत जाण। परि आत्माचि कारण अवघ्यांसी ॥ ८४ ॥ पहा राजा, अधिकारी, राजदूत। या अवघ्यातिघांप्रत। कारण राजसत्ता सत्य। परि भिन्नत्व तिघा यीं ॥ ८५ ॥ राजास बसावया सिंहासन। गज पालखी नाना यान। राजा स्वइच्छे करून। अवघ्यांलागीं वागवितो ॥ ८६ ॥ राजाज्ञेस अनुसरून। अधिकारीवर्ग वर्ते जाण। त्यांच्या इच्छेस अवलंबून। राहावें लागतें राजावरी ॥ ८७ ॥ बजावणी राजाज्ञेची। राजदूत करिती साची। परि त्यांच्या इच्छेची। गती येथें कुंठित ॥ ८८ ॥ राजसत्तेच्या आवरणांत। ही वागते अवघी रयत। परी कारण अवघ्यांप्रत। आहे एक राजसत्ता ॥ ८९ ॥ राजेपण सचीवपण। दूतपण रयतपण। हें अवघें अवलंबून। आहे राजसत्तेवरी ॥ ९० ॥ राजा अधिकारी राजदूत। तैसीच ही अवघी रयत। या सर्वांपासून खचित। आहे भिन्न राजसत्ता ॥ ९१ ॥ एक राजा मृत होतां। नष्ट न होय राजसत्ता। म्हणून तिची भिन्न कथा। उघड उघड दिसते कीं ॥ ९२ ॥ परी तादात्म्य राजसत्तेसी। जो होतो निश्चयेसीं। राजेपण तयासीं। लाभते हा न्याय असे ॥ ९३ ॥ स्वतः ती राजसत्ता। अविक्रिय आहे सर्वथा। मात्र तिचा आधार पोंचतां। सर्व कांहीं घडतसे ॥ ९४ ॥ तूं जो बैसतोस गादीवर। तो राजसत्तेच्या जोरा-

वर । जो पंखा वारी तुजवर । तव शिपाई नारायणा ॥ ९५ ॥ तोही राजसत्तेनीं । पंखा वारी तुजवरी जाणी । तुम्हां उभयतां लागूनी । कारण सत्ता एकची ॥ ९६ ॥ पूर्ण राजसत्तेचा । अनुभव राजा घेत साचा । तिच्या कांहीं अंशाचा । अनुभव घेत अधिकारी ॥ ९७ ॥ त्याही पेक्षां कमी अंश । लाधलासे शिपायास । नुसत्या तिच्या आश्रयास । राहून रयत वर्ततसे ॥ ९८ ॥ तैसे आत्मे पारमार्थिक । ब्रह्मासी तादाम्य होती देख । म्हणून त्यांना ब्रह्मसुख । पूर्ण लाधे नारायणा ॥९९॥ ऐसें ऐकतां गुरूभाषण। तो गोविंदात्मज नारायण। बोलता झाला कर जोडून । त्या साई समर्थासी ॥१००॥ निरवयव राजसत्तेचे । अंश कैसे पडतील साचे । अंश पडतां तियचे । निरवयत्व जाईल ॥ १०१ ॥ महाराज ह्मणती तेधवां । नाना प्रश्न केलास बरवा । तेणें समाधान माझे जिवा । झालें असे ये काळीं ॥ १०२ ॥ राजसत्ता अभेद खचित । परी विभागाची येते प्रचीत । तोच न्याय चैतन्यांत । अनंतरूप दिसे जें ॥ १०३ ॥ त्या सत्तेचे न अंश पडती । परी ग्राहक भाग पाडून घेती । जैसी ज्याची असे शक्ती । तो तितुके घेत असे ॥ १०४ ॥ घट बोळकें रांजण । डेरा गेळा माथणी जाण । या अवध्यांत भरून । आकाश राहिलें नारायणा ॥ १०५ ॥ आकाश जेव्हडें नदींत । त्यापेक्षां थोडें किंचित । समावलें रांजणांत । त्यापेक्षां घटांत कमी॥१०६॥ गेळ्या बोळक्यापाशीं जाण । कमी असे त्याहून । आकाशाचे कां ह्मणून । भाग येथे पडले बा ॥१०७॥ तीच आहे तेथें स्थिती । हें नाना आण चित्तीं । हें आत्म्याचें रूप निश्चितीं । तुजलागीं निवेदिलें ॥ १०८ ॥ हें जें अवघें दिसतसे जगत । तो मायेचा खेळ सत्य । मायाब्रह्म एकचित्त । होऊन ब्रह्मांड रचियेलें ॥ १०९ ॥ तैं म्हणे तो नारायण । समर्था ही माया कोण । कधीं कोणी निर्माण । केलें इस ती आहे कसी ॥ ११० ॥ जगाचें आद्य कारण । आपण कथिलें चैतन्य । जग त्याहून नसे भिन्न । मग ही माया आली कशी

॥१११॥ महाराज बोलले त्यावरी । माया उद्भवली कैशापरी । तें मी सांगतों निर्धारीं । ऐक आतां एकचित्तें ॥ ११२ ॥ त्या चैतन्याची जी शक्ति । तीच माया निश्चितीं । तिनें या चैतन्याप्रती । ठायीं ठायीं नटविलें ॥ ११३ परी निवड करूं जातां । वेगळी न होती सर्वथा । गूळ गोडी निवडितां । जैसी नाना नये कीं ॥ ११४ ॥ वा सूर्य आणि प्रभा त्याची । पृथक करितां नये साची । तीच ब्रह्म आणि मायेची । आहे स्थिती चांदोरकरा ॥ ११५ ॥ सूर्य आणि प्रभा जाण । शब्द जरी भिन्न दोन । परी प्रभा सूर्य मिळोन । सूर्य आला आकारा ॥११६॥ सूर्य आपल्या प्रभेकरून । आपुलेंच जगा करवितो ज्ञान । माया ब्रह्मांत तो जाण । प्रकार आहे नारायणा ॥ ११७॥ परी माया आहे सांत । चैतन्य तें अंतातीत । परी दोहोंचें अनादित्व कायम आहे सर्वथा ॥ ११८ ॥ माया ती प्रकृति । चैतन्य पुरुष निश्चितीं । या दोहोंपासून उत्पत्ती । झाली जगाची या वत्सा ॥ ११९ ॥ प्रकृति पुरुषाचें विवरण । गेला ज्ञानराजा करून । अमृतानुभवा माजीं जाण । मोहिनी राज प्रसादें ॥ १२० ॥ म्हणून आतां तयाची । पुनरुक्ति न मी करीं साची । फक्त त्या आत्मज्ञान गुहेची । ओळख देतों करून ॥ १२१ ॥ जे जे त्या गुहेंत । गेले ते न येती परत । ते गुहाच होऊनियां तेथ । आनंदानें राहती ॥ १२२ ॥ पुरुष अवध्याचा कारण । माया हें कार्य जाण । त्या मायेचें महिमान । अगाध आहे नारायणा ॥ १२३ ॥ मी गोम्या तिम्या अमका कोणी । भास हें जें वाटतें नाना मनीं । तें मायेच्या योगानीं । असत्या होतसे ॥ १२४ ॥ मायेनें वेधिल्या पूर्ण । सत्याचें न राहे भान । माये माजीं दोन गुण । आहेत ते ऐके आतां ॥ १२५ ॥ जें आहे त्या झांकणें । जें नाहीं तें भासवणें । त्या मायेच्या योगानें । भ्रमित होतो जीव हा ॥ १२६ ॥ एका मजुरास पडलें स्वप्न । कीं मी राजा झालों म्हणून । येथें प्रथमतः

मजूरपण । त्याचें झांकिलें मायेनें ॥ २७ ॥ वास्तविक नसतां राजेपण । तें त्या मायेनें भासविलें जाण । तैसें ब्रह्मास झांकून । जगांत माया दावितसे ॥ १२८ ॥ वस्तुता हें नोहे जगत । एक चैतन्य वस्तु सत । परी मायेमुळें आलें प्रतीत । जगत आहे म्हणूनी ॥ १२९ ॥ जगतासह जगताचे । विषय अवघे असत्य साचे । परी त सत्य वाटून जगताचे । अकल्याण करिताती ॥१३०॥ यासाठींच आवरण । टाका मायेचें ज्ञानें करून । मग दिसेल शुद्ध चैतन्य । तूंच अवघा ह्मणोनी ॥ १३१ ॥ पाण्याचें गेल्या गढूळपण । जैसें दिसतें शुद्ध जीवन । तैसें मायेचें गढूळपण । टाकितां चैतन्य दिसेल कीं ॥ १३२ ॥ त्या सद्वस्तूची उपासना । तुवां करावी नारायणा । हेंच माझें अवघ्यांना । आहे आतां सांगणें ॥१३३॥ आत्मा तीच सद्वस्तु । हा अध्यात्माचा होय हेतु । तो आत्मा जाणून तं । ह्याच जन्मीं मुक्त व्हावें ॥ ३४॥ ऐसें ऐकतां ब्रह्मज्ञान । अवघे आनंदलें पूर्ण । समर्थपदीं लोटांगण । घालू लागले शिष्य ते॥१३५॥ वैद्य साठे चांदोरकर । वेर नाना निमोणकर । मारुती लक्ष्मण नूलकर । किती म्हणोन वर्णावे ॥ १३६ ॥ अनुलक्षूनी या अवघ्यांसीं । महाराज बोलले प्रेमेंसी । वत्सांनो या ज्ञानासीं । ठेवा मनीं जागृत ॥ १३७ ॥ तथास्तु म्हणती अवघे भक्त । वारंवार घालिती दंडवत । ज्ञाननभींचा सविता जेथ । तेथें अंधार कोठोनी ॥ १३९ ॥ हे साई महाराज कृपाराशी । पदरीं घ्या या लेंकरासी । आपुल्या कृपाछायेसीं । बैसवा हा दासगणू ॥ १३९ ॥ स्वस्तिश्री संत कथामृत । साईमहाराज मेघ येथ । वर्षला हें ज्ञानामृत । त्यासी सेवा म्हणे गणू ॥१४०॥ इति सप्तपंचाशत्तमोऽध्यायः समाप्तः

## श्री दासगणूकृत श्री संत कथामृत

### यातील श्री साईबाबाविषयींचा ५७ वा अध्याय.

हा ग्रंथ अत्यंत दुर्मिळ झाला असल्यामुळें त्याचें पुनर्मुद्रण व्हावें असें सुचविल्यामुळें या ग्रंथाचे अध्याय पहिल्यापासूनच श्री साईलीलेंत या पुढें छापून प्रसिद्ध होतील.

—संपादक.

रामाला केलें. वसिष्ठाच्या सांगण्यावरून विश्वामित्राजवळ अस्त्रसंग्रह चांगला आहे असें श्रीरामास समजलें होतें. तरी मला अस्त्रांची माहिती द्या अशी त्या मानी श्रीरामानें कधीं याचना केली नाहीं; कारण त्याला आत्मविश्वास इतका होता कीं, आपल्या गुणानें गुरूची आज्ञा परिपालन करून त्याची कृपा संपादन केली तर आपणांस गुरूचा प्रसाद मिळणारच आहे. त्याप्रमाणें वागून म्हणजे राजपुत्र असूनही त्या वैभवाचा अभिमान न धरितां गुरूप्रमाणें अरण्यांतील शीतोष्णादि द्वंद्वांचा आनंदानें स्वीकार करून व गुरूच्या आज्ञेप्रमाणें ताटिकेचा वध करून क्षात्रधर्माची परीक्षा दिली; तेव्हां याचना केल्यावांचून गुरूनें आपले जवळचीं सर्व अस्त्रें × श्रीरामास देऊन आपणासारखें त्याला सामर्थ्यवान केलें. गुरुकृपेनें प्रसाद मिळाल्यावर शिष्याला स्वहिताचे प्रश्न विचारण्याची सहज प्रवृत्ति होते. त्याप्रमाणें विश्वामित्रानें अस्त्रदान केल्यावर श्रीरामाला वाटलें कीं, हीं अस्त्रें बाळगून तीं सोडलीं असतां संपून जातील; मग पुढें आपणाजवळ शिल्लक कांहीं रहाणार नाहीं; याजकरितां तीं अस्त्रें सतत कशीं कायम रहातील हें शिकून घ्यावें असा विचार करून श्रीराम म्हणाले, "गृहीतास्त्रोऽस्मिभगवन्दुराधर्षः सुरैरपि ॥ अस्त्राणांत्वहमिच्छामिसंहारान्मुनि पुंगव" (वा. रा. १।२८)

अर्थ-हे भगवान् मी अस्त्रांचा स्वीकार केला आहे व त्यामुळें मी आतां देवांनाही अजिंक्य झालों; परंतु हे मुनि, श्रेष्ठ अस्त्रांचा उपसंहार कसा करावा हें जाणण्याची मला इच्छा आहे. असें विचारल्याबरोबर विश्वामित्रास आनंद झाला. त्याला वाटलें कीं, शिष्य चतुर आहे. याप्रमाणें शिष्याचा भक्ति व चतुराई पाहून त्यानें अस्त्रोपसंहार शिकवून त्याला आपलेप्रमाणें दुर्धर्ष केलें. सारांश गुरु उत्तम प्रकारचा ज्ञानी असून शिष्य श्रद्धाळु, निष्कपट व कोणतेंही कार्य करण्यांत दक्ष असा असला तर गुरु त्याला 'आपणासारीखे करिती तात्काळ ॥ नाहीं काळवेळ मग त्यासी' असें संत तुकाराम महाराज म्हणतात. याजकरितां 'शिष्यास न लाविती साधन ॥ न करविती इंद्रियदमन ॥ ऐसे गुरु

× अस्त्रांचीं नांवें मुळांतून वाचावीं.

अडक्याचे तीन ॥ मिळाले तरी त्यजावे ॥ दा. ५।२।२१॥ या समर्थांच्या वचनाप्रमाणें परीक्षा करून गुरु करावा. 'शिष्य पाहिजे युक्तिवंत ॥ शिष्य पाहिजे बुद्धिवंत ॥ शिष्य पाहिजे संतासंत ॥ विचार घेता ॥ दा ५।२।२७ ॥ याप्रमाणें आपली योग्यता करून घेऊन आपण गुरु-प्रसादास योग्य आहों अशी पात्रता गुरूचे निदर्शनास आणून देऊन

पद

सद्गुरु सेवन करमन भाई ॥ नाथ निरंजन सांइ गुसाई ॥ ध्रु० ॥
शीलधिवासी सगुणरूपधारी ॥ भक्तजनेदित मन भयहारी ॥ १ ॥
सांइ धरे कर शिरपर जाके ॥ गुरुता बंधन तूट जलाके ॥ २ ॥
साइ कृपा विन पान न हाले ॥ सत्यव्रजकर आनंद डोले ॥ ३ ॥

असा नित्य मनाला बोध करून ' आला भागासी तो करी-व्यवसाय ॥ परी राहो भाव तुझेठाई ॥ ' या तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणें कर्तव्याला जागृत राहून सद्गुरु साई नाथाची प्रार्थना केली असतां सद्गुरु ' आपणा सारीखे करीती तात्काळ ॥ म्हणून ज्याप्रमाणें श्रीरामानें स्वकर्तव्य करून गुरुप्रसाद संपादन केला त्या प्रमाणेंच भारतवासियानें कर्तव्यास जागृत राहून श्री सांईनाथ कृपा संपादन करावी. इतकें सांगून लेखणीस रजा देतों.

ॐ तत्सत्

स्वामी कृष्णानंद

माहपा. पूर्वाश्रमीचे कृष्ण जोगेश्वर भीष्म.

श्री साइनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

अंक १३, वर्ष ८ ] फाल्गुन [ शके १८५३

१२वा महिना.

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका

—शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका.

| | |
|---|---|
| अनुभव ... ... ... ... ... ... | १-१२ |
| शके १८५३ च्या श्रीगुरुपौर्णिमेच्या उत्सवाप्रीत्यर्थ वर्गणी देणारांची यादी ... ... ... ... | १३-१६ |
| शके १८५३ च्या पुण्यतिथी उत्सवाचा अहवाल ... | १७-२४ |
| शके १८५३ च्या श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबा महाराजांच्या पुण्यतिथी उत्सवाचा जमाखर्च ... ... | २५-२९ |
| सिंहावलोकन ... ... ... ... ... | ३०-३२ |

## विनंति.

सुप्रसिद्ध श्री मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु. २.

कै. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर यांचा सुप्रसिद्ध ओजस्वी व प्रासादिक श्रीसाईसच्चरित हा ग्रंथ बांधून तयार आहे. पानें अदमासें १०००. किं. रु. २--८--०.

**रा. आ. तर्खड.**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी.**

## श्री साई भक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड,**

—प्रकाशक.

# अनुभव

## अपूर्व शिक्षण " मी आहें ना तुझ्यापाशीं ? "

श्रीसाईमाऊलीची अध्यात्मिक शिकवण किती तरी साधी, अप्रतिम आणि परिणामकारक अशी दृष्टोत्पत्तीस येत होती व अद्यापीही येत आहे ! !

" बाबा ! आतां घरीं परत जाण्याची आज्ञा ? "

" पाहूं ! त्याचा विचार दुपारला करूं ! "

दोनप्रहरीं याचप्रमाणें विचारलें असतां,

" पाहूं ! सकाळला ! "

याप्रमाणें भक्ताच्या मनाची चलबिचल अथवा त्याचीं आर्थिक संकटें यांचा पूर्ण विचार करून, त्यांविषयीं योग्य तो इलाज घेऊन बाबा प्रत्येक भक्ताला तात्बडतोब अथवा उशिरां, कधीं कधीं त्याच्या मर्जीविरुद्धही, घरीं परत जाण्याची आज्ञा देत असत.

लेखकाला पक्कें स्मरतें कीं, श्रींनीं कै. लोकमान्यांच्या एका परमप्रसिद्ध व एकनिष्ठ मित्राला कित्येक महिने शिरडीस अडकवून ठेविलें होतें ! परत जाण्याची परवानगी मुळींच देईनात. हे गृहस्थ मोठे विद्वान, सुधारक वृत्तीचे असूनही, अत्यंत श्रद्धावान् असल्यामुळें, श्रींच्या आज्ञेचें त्यांनीं यत्किंचितही उल्लंघन केलें नाहीं. महिनोगणती शिरडीस राहिल्यामुळें त्यांचें आर्थिक नुकसान हजारों रुपयांनीं झालेलें आम्हां सर्वांना स्पष्ट दिसत होतें, पण त्याची त्यांनीं मुळींच पर्वा केली नाहीं.

कै. लोकमान्यांना त्यावेळीं सजा होऊन सरकारनें त्यांस मंडा- अडकवून ठेविलें होतें, आणि त्यांच्या मित्रमंडळीच्या हालचालींव ठेविली होती.

यदाकदाचित् श्री साईबाबांच्या आज्ञेचें उल्लंघन करू त्यांनीं शिरडीहून प्रयाण केलें असतें तर ते निःसंशय मोठ्या

असतें, असें त्यांना स्वतःला व त्यांच्या निकट सहवासांत असणाऱ्या मित्रमंडळीला वाटत होतें.

श्रीसाईबाबा कोणासही शिरडींत उगाच अडकवून ठेवीत नसत. लेखकाचा मित्र म्हणतो त्याला पक्कें स्मरतें कीं, एके वर्षी त्याच्या कंपनीची वार्षिक सभा भरावयाची होती. तो मोठ्या हुद्यावर असल्यामुळें या सभेला त्याला जरूर हजर राहावयाचें होतें. सभेला अद्यापि पांच सहा दिवसांचा अवसर पाहून तो त्या वर्षी (बहुधा इ. स. १९१२ च्या विजयादशमीचा सुमार असावा.) शिरडीस गेला होता. मतलब हा कीं, तेथें श्रींच्या पायांपाशीं तीन दिवस राहून, श्रींची परवानगी घेऊन नंतर त्या सभेसाठीं हजर राहावें.

दररोज सकाळीं शिवेच्या ओढयावर दूरवर एकांताची जागा पाहून तेथें स्नान करावें असा त्याचा हमेशाचा प्रघात असे. त्याप्रमाणें त्या वेळींही स्नान करतांना त्या ओढयांतल्या पाण्याला म्हणजे श्रीगंगेला (श्रीगोदावरीचेंच पाणी तें) एक पैसा अर्पण करून, तिला करुण वाणीनें, "गंगे! आज तुझें शेवटचें स्नान काय? उद्यां तुझें दर्शन कुठलें?" असें प्रेमानें आणि कळकळीनें बोलून, नंतर कपडे वगैरे धुवून, श्रींच्या दर्शनासाठीं, त्या मशीदरूपि देवळांत जाऊन, श्रींचें तेथें दर्शन घ्यावें, श्रीसाईबाबांच्या गोड गोष्टी ऐकाव्या, त्यांत आपणाला समजेल तोच बोध घेऊन मनांत पक्की गांठ बांधावी, आणि नंतर हळूच परत जाण्याची परवानगी मागावी, तेव्हां बाबांचें उत्तर "उद्यां बघूं!"

शिवेच्या ओढयाला त्या वेळेस बाराही महिने भरपूर पाणी असे. पाणी उथळ असे आणि जागजागीं त्याचे लहान लहान फांटे होऊन ते कांहीं अंतरावर पुन्हा एकत्र होत, आणि पुन्हा पुढें विभागत; असें होत असतांना पाण्यांतून जो अत्यंत मधुर कलकल असा शब्द निघत असे तो आज लीलेंत प्रतिवर्षे झालीं तरी कानांत अद्यापि आपली आठवण देऊन आनंद पाठविल्यास आहे!

शिवेच्या ओढयाचा शुकशुकाट व त्यांत वाढलेलें गवत पाहून
होतो. पाटबंधाऱ्यामळें तें फकट जागारें पाणी आज उपयोगांत

येऊन उसांच्या मुख्य लागवडीनें मधुर रस आणि गूळ उत्पन्न करून, निराळ्या तऱ्हेचा आनंद उत्पन्न करीत आहे. कानांनीं उत्पन्न होणाऱ्या आनंदाचें रूपांतर रसनेनें होणाऱ्या आनंदांत झालें आहे.

एक आनंद स्वर्गीय स्वरूपाचा होता तर दुसरा केवळ ग्राम्य स्वरूपाचा आहे !

शिवेच्या ओढ्यावर त्या झुळझुळ वाहाणाऱ्या पाण्याच्या कलकल निनादांत तें पाणी जसें आपल्याशीं प्रत्यक्ष बोलत आहे, प्रेमानें आपणाला कुरवाळीत आहे, असें वाटे. याप्रमाणें बाह्यांग स्वच्छ होतांना जो वर वर्णन केलेला मानसिक आनंद व त्याकरवीं एक प्रकारची चित्तशुद्धि उत्पन्न होत होती[1] त्या आनंदाच्या भरांत माझ्या स्नेह्यानें त्या श्रीगंगेच्या पाण्याबरोबर "श्रीगंगे, आज हें शेवटचें स्नान काय ? उद्यां तुझें दर्शन कुठलें ?" वगैरे वगैरे अशाच प्रकारचे प्रेमानें उच्चारलेले शब्द श्रीसाईबाबांच्या कानांवर तत्क्षणींच जात होते.

याचा दाखला श्रींनीं स्नेह्याचा धाकटा मुलगा आपल्या वडिलांप्रमाणेंच श्रीगंगेंत स्नान करतांना हेच शब्द त्याच भावनेनें बोलत असे, ज्याचा खुलासा श्रींनीं कै. दीक्षित वगैरे मंडळीसमोर एके दिवशीं याप्रमाणें केला होता ! "काका ! हा भाऊ रोज पाण्याबरोबर बोलतो रे 'मला ठेव,' 'मला ठेव,' म्हणून त्याला मला ठेऊन घ्यावं लागतं रे ! "

पुण्यात्मा श्रीसाईबाबांचें सर्व दृश्य व अदृश्य सृष्टीशीं तादात्म्य, याचा हा एक उत्कृष्ट दाखला आहे.

आपल्याकडे आलेल्या प्रेमळ पाहुण्यास त्यानें ठेवून घेण्याचा कल दिसल्यास कोण यजमान त्याला जा म्हणून म्हणेल ? तेव्हां लेखकाच्या स्नेह्याला ठेवून घेण्यांत श्रीसाईमाउलीपाशीं जीं कांहीं अनेक कारणें अस-

---

१. तीर्थांच्या ठिकाणीं स्नानें करण्याची आणि रोजचें स्नान करितांना पवित्र नद्यांना आवाहन करण्याची महति व इंगित याचमुळें असावें असें वाटतें.

—संपादक.

तील त्यांत अप्रत्यक्ष रीतीनें श्रीगंगेपाशीं केलेली ही प्रेमपूर्वक याचना इचा समावेश त्यांनीं त्यांत जरूर केलाच असला पाहिजे, हें उघड दिसतें.

असो ! तीन दिवस झाल्यावर वार्षिक सभेची आठवण होऊन परवां सभा, तर उद्यां येथून निघालेंच पाहिजे हा विचार येऊन त्याच्या मनांत धस्स झालें !

दुसऱ्या दिवशीं सकाळीं कै. काकासाहेब दीक्षितांना बरोबर घेऊन, त्यांच्या मध्यस्थीचा उपयोग करावा या हेतूनें श्रींच्याजवळ तो गेला.

तेव्हां बाबा म्हणाले, " अरे ! असं काय करतोस ! तूं काय रानावनांत आहेस ? उद्यां बघूं ! "

काकासाहेब म्हणाले, "बाबा ! त्यांची वार्षिक सभा उद्यां आहे ना ?"

बाबा म्हणाले, " काका ! त्याची चिंता तुला कीं मला ? " नंतर मित्राकडे वळून म्हणाले, " पारोशानेंच मला भेटायला आला ! "

हें ऐकून तो मनस्वी खजिल झाला. अनेक वेळां शिरडीस गेला असेल. परंतु स्नान केल्याशिवाय श्रींचें दर्शन घ्यावयाचें नाहीं अशी त्यानें वहिवाट ठेवल्यामुळें, तिचा भंग केल्याचें आपल्या निदर्शनास आणून, आपल्या हातून अपराध घडल्याचें त्याला वाटून त्या विचारामुळें तो सभेचा वगैरे सर्व विचार विसरून गेला. रोजच्याप्रमाणें ओढयावर स्नानासाठीं गेला; तेथें हमेशाप्रमाणें श्रीगंगेबरोबर त्यानें प्रेमानें भाषण केलें.

त्या दोनप्रहरीं व त्यानंतर मुंबईस जाण्याचें तो साफ विसरून गेला होता.

सभेचा दिवस उलटून गेल्यावर, संध्याकाळीं बाबा स्नेह्याच्या बायकोला म्हणाले, " आये ! उद्यां मोठ सकाळला आपुन घरीं जाऊं बरं का ! मी बरोबर येईन बरं ! चिंता करूं नकोस ! "

हे शेवटचे शब्द त्यालाच उद्देशून असावे असें मित्राला वाटलें, कारण श्रींवर सर्व संसाराचा सर्व प्रकारचा भार त्या उभयतांनीं टाकला होता.

" आये, तुझ्या संसाराची चिंता मला " हें बाबांचें आश्वासन त्या उभयतांच्या कानांत हमेशा गुणगुणत असल्यामुळें त्यांचीं मनें निश्चित होतीं.

त्याप्रमाणें तीं उभयतां दुसऱ्या दिवशीं सकाळीं पारोशानेंच श्रींच्या चरणाजवळ निरोपासाठीं गेलीं. बाबा त्यासंबंधानें कांहीं बोलले नाहींत; उलट प्रेमानें निरोप दिला आणि म्हणाले, " जा बरं ! मी तुमच्यासोबत आहें !"

त्याप्रमाणें सकाळीं सात वाजतां शिरडीहून निघून, दहा वाजतां कोपरगांव, व बारा वाजतां मनमाडहून एक्स्प्रेस पकडून, संध्याकाळीं सहा वाजतां तीं उभयतां सुखरूप घरीं आलीं.

दुसऱ्या दिवशीं मित्र आपल्या कचेरींत गेला. तेव्हां कै. श्री.बाळकराम, जे त्याच्या हाताखालीं त्यावेळीं नोकरीस होते ते त्याला म्हणाले, "बाबासाहेब ! तुम्ही परवां मीटिंगला हजर नव्हतां. आम्ही जाणलें कीं, बाबांनीं तुम्हांला जरूर ठेवून घेतलेंच असावें. कारण जी गोष्ट आज इतके वर्षांत कधींही न घडलेली, ती यंदा दिसून आली, कीं कायद्याप्रमाणें मीटिंगला जितके सभासद हजर असावयास पाहिजेत तितके हजर नसल्यामुळें, सभा भरलीच नाहीं, आणि सभा आठ दिवस लांबणीवर ठेवण्यांत आली आहे ! "

मित्र म्हणतो कीं, त्या क्षणापर्यंत त्याला त्या सभेची पूर्ण विस्मृति होती. हा सर्व घडलेला प्रकार जाणून त्याच्या व कै. बाळकरामाच्या डोळ्यांतून घळघळ प्रेमाश्रु वहावयास लागले. आणि स्नेह्याच्या मालकालाही सानंदाश्चर्य वाटलें.

या गोष्टीचा कै. बाळकराम यांच्या मनावर इतका दृढ परिणाम झाला कीं, त्यांना त्यानंतर यजमानानें मोती खात्यावर मोठ्या पगारावर स्वतंत्र हुद्यावर नेमिलें असतांही, यजमानाच्या प्रेमाची, पगाराची, व स्वतःच्या लहान लहान लेंकरांचीही पर्वा न ठेवितां, त्यानीं जी श्रींच्या पायांपाशीं धाव घेतली ती कायमचीच. तेथें दोन तीन वर्षांनंतर त्यानीं समाधि घेतली.

असो ! मूळ मुद्यावर येऊं. " जा बरं ! मी तुमच्या बरोबर आहें " हें आश्वासन श्रीसाईबाबा प्रत्येक भक्ताला परत जातेवेळीं देत असत.

त्यावेळीं मोटरी नव्हत्या. टांगे व बैलगाड्या यांचीच सोई असे. मुंबईच्या मंडळीजवळ कांहीं तरी ऐवज जरूर असलाच पाहिजे, असें मानून

शिरडी ते कोपरगांव, अथवा पावसाळ्याचे दिवसांत श्रीगंगेला महापूर असल्यास शिरडी ते चितळी या पल्ल्यांतल्या त्या वेळेच्या रूक्ष प्रदेशांत त्या सडकांवर क्वचित् प्रसंगीं टांगे अथवा बैलगाडया लुटण्यांत येत असत आणि प्रवास करणाऱ्या स्त्री-पुरुषांस चोरांकडून हाणमार व **लाठीमार** होत असे.[1]

म्हणून बहुधा घरीं जाईपर्यंत आपणाला कांहीं त्रास होणार नाहीं, असाच बहुतेक श्रीसाईमाऊलीच्या आश्वासनाचा अर्थ समजून आपल्या मनाचें समाधान करीत असत. कांहीं धूर्त[2] जन, एखाद्या हट्टी पोराप्रमाणें आपल्या आईची कास न सोडतां तिला चिटकून राहून, आणि गळ घालून या आश्वासनाचा लाभ केवळ त्या प्रवासापुरताच न घेतां, या संसारयात्रेच्या आणि या नंतरच्या संपूर्ण प्रवासापर्यंत लावून घेऊन स्वस्थ बसत आणि त्यामुळें बाबा त्या प्रीत्यर्थ वेळोवेळीं प्रोत्साहनपूर्वक दाखले घडवून आणून त्या हट्टी पोरांचे लाड पुरवीत आले आहेत.

आतां मजा पहा ! प्रभु हृदयस्थ आहे हें कै. रा. गो. भांडारकर, मोडक, रानडे, वगैरे थोर पुरुषांनीं प्रार्थनासमाजांत व्याख्यानें व कीर्तनें वगैरेंच्या द्वारें प्रतिपादन करावें, पण सारें अळवावरचें पाणी ! देव हृदयस्थ आहे खरा, कारण तो सर्वव्यापी आहे. परंतु कोणत्याही मूर्त स्वरूपांत त्याला मनःचक्षूंपुढें ठेवण्याची शिकवण नसल्यामुळें त्याचें ध्यान कसें करावें हें मुळींच कळेना. आणि ध्यान करण्याची शिकवण नसल्यामुळें केवळ प्रार्थनेनें मनाचें समाधान होत नाहीं. प्रार्थना परिणामकारक आहे ही गोष्ट निःसंशय आहे. आपल्या अंतःकरणांतलें सुखःदुख निवेदन केल्यानें ज्या प्रकारानें पतिपत्नी, मायलेंकरें, सुहृद बंधु, आणि त्याचप्रमाणें दरिद्री नारायणांचीं रूपें, आणि

---

१ आतां हाच प्रदेश, पाटबंधाऱ्यामुळें श्रीगंगेच्या पाण्याचा मुबलक पुरवठा होऊन, उसांच्या लागवडी, फळझाडांच्या बागाइती आणि त्या सर्व उत्पन्नाच्या वाहतुकीसाठीं मोटरी गाडया व माणसें यानीं सारखा गजबजलेला आहे.

२ अशानां बाबा कौतुकानें बोलत " आले ! माझीं आंतडीं खायला ! ! "

—संपादक.

तत्सम जनता, यांचीं मनें आकर्षिलीं जाऊन परस्परांविषयींचें प्रेम व विश्वास दृढ व वृद्धिंगत होतात, तर त्याच प्रकारानें त्या सर्वव्यापी **सर्वशक्तिमान** अत्यंत दयाळू व कृपाळू परमेश्वराचें, प्रार्थना करितांना इष्ट मूर्त स्वरूप मनःचक्षूंपुढें ठेविल्यास, तोच अगम्य निराकार प्रभु आपुलकीचा वाटून, त्याला हव्यासानें हृदयांत सहज कोंडून ठेवितां येतो; आणि त्यामुळें आपल्याप्रमाणें इतरांच्या हृदयांत त्याचें अस्तित्व आपल्याप्रमाणेंच पूर्ण प्रमाणानें भरलेलें आहे याचा अनुभव भक्ताला घेतां येतो.

लेखकाच्या मित्राला हा अनुभव इतर साईभक्तांप्रमाणेंच श्रीसाईबाबांच्या चरणांपाशीं बाबांच्या वर दर्शविलेल्या श्रींच्या आश्वासनानें हळूहळू अनुभवांत आला. जें काम पोथ्या-पुस्तकांच्या कोरड्या वाचनानें शोधित असतांही त्याला त्याच्या पंधराव्या वर्षापासून तों पंचेचाळिसाव्या वर्षापर्यंत झालें नाहीं, तें **श्रीसाईबाबांनीं आपल्या सहज लीलेनें** केलें. आणि **यासाठींच** " चला ! मी तुमच्याबरोबर येतों. मी तिकडे तुझ्यापाशीं नाहीं काय ? " या गोड शब्दांवर सर्वस्वीं भार ठेवून प्रत्येक साईभक्तानें, श्रीसाईबाबा आपल्यापाशींच आपले हृदयस्थ होऊन बसले आहेत, हें सारखें मनावर ठसवून घेऊन, अनुभवानें पाहावें.

हें कसें करावें, हें ज्याच्या त्याच्या इच्छेवर व निष्ठेवर पूर्णपणें अवलंबून आहे. श्रीसंत कबीर म्हणतात " जो तू चाहो मुझको, मेरी सकलही आस। मेरा ऐसा व्है रहै सब कच्छू तेरे पास " ॥ साकी ॥ अथवा श्रीगीतेंत श्रीभगवान म्हणतातः—

" ये यथा मां प्रपद्यंते, तांस्तथैव **भजाम्यहम्** " हें व्हावें कसें ? कळावें कसें ? यासाठींच श्रीसाईबाबांनीं किती तरी स्वल्प रीतीनें " चला ! मी तुमच्याबरोबर येतों, " " मी तिकडे तुझ्यापाशीं नाहीं काय ? " याचे साक्षात् अनुभव देऊन **हृदयस्थ प्रभूची** जाणीव षट्शास्त्रांचें अध्ययन, वादविवादि ऊरफोड, हटयोगाचे प्रकार, या सर्व क्लिष्ट साधनांना बाजूला सारून, आपल्याप्रमाणें सर्व गरीब, अज्ञानी स्त्रीपुरुषादि संसारक्लेशांत गुरफटलेल्या जीवांत ती जाणीव सहज रीतीनें करून दिली आहे, आणि देत आहेत.

या पृथ्वीवर अनेक धर्म, अनेक चालीरीति, अनेक शिष्टाचार आहेत. त्या सर्वांतील अंतिम रहस्य व ऐक्यता श्रीसाईबाबांनीं दृग्गोचर करून दिली आहे, आणि प्रचलित जिज्ञासूंना या अनुभवांच्या परिशीलनानें व आपल्या अतुल उदीनें ती जाणीव अद्यापि आणीत आहेत.

श्रीसाईबाबांच्या अप्रतिम व मनोहर लीलांनीं आणखी तें कसें प्रत्यक्ष अनुभवांत आणून शिकवावें बरें !

"म्हातारा"

वांद्रें, ता. १८ फेब्रुवारी १९३२.

× × ×

## स्वप्नसृष्टि

गत वर्षीं श्रीगुरुपौर्णिमेच्या वेळीं शिरडींत कै. काकासाहेब दीक्षित यांच्या "दीक्षीतवाड्याच्या" माडीवर श्रीसाईबाबांच्या उदीविषयीं बोलत असतां, श्री. माधवरावजी देशपांडे यांनीं आपला एक अपूर्व अनुभव सांगितला, तो येणेंप्रमाणें:—

"श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबांच्या हातून जी प्रत्यहीं चिमूट चिमूट उदी मिळत असे, ती घरीं आल्यावर एका रांजणांत श्री. माधवरावजी ठेवीत असत.

सुमारें ७–८ वर्षांमागें श्री. माधरावजी कांहीं कामासाठीं मुंबईंत गेले होते, आणि कांहीं दिवस तेथें राहावयाचा त्यांचा हेतूही होता.

तो दिवस जाऊन रात्र सरतां पहांटेस त्यांना एक स्वप्न पडलें कीं, "त्यांच्या कुटुंबियांपैकीं कोणा एका स्त्रीला पापड कीं काय ठेवण्यासाठीं एका रांजणाची गरज पडली आहे, आणि घरांत तपास करतां तो उदीचा रांजण तिला दिसला, आणि त्यांत उदी नव्हे पण केवळ निरुपयोगी राख आहे असें तिला वाटून ती राख टाकून देऊन तो रांजण वापरण्याचें तिनें योजिलें आहे."

स्वप्न इतकें स्पष्ट पडलें होतें कीं, श्री. माधवरावजींना जरी जरूरीच्या कामासाठीं आणखी बरेच दिवस मुंबईंत राहावयाचें होतें तरी तें सर्व काम बाजूला सारून त्याच दिवशीं पहिली मिळेल ती गाडी पकडून ते सरळ शिरडीला आले, आणि पाहातात तों स्वप्नांत पाहिल्याप्रमाणेंच तो रांजण खालीं करून त्यांतील उदी केवळ गैरसमजुतीनें राख समजून टाकून देण्याची त्या बाईची खरोखरीच तयारी झाली होती.

जर श्री. माधवराव यांची शिरडीस येण्याची ती वेळ टळली असती तर त्या अमोल्य उदीचा केवळ गैरसमजुतीनें नाश झालाच असता.

ता. १९–२–३२
१०, जर म्यान्शन,
वांद्रें.

**रा. आ. तर्खड,**
संपादक.

# अनुभव

सा. न. वि. वि. माझी ही करुण कहाणी श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध व्हावी म्हणून मी आपणाकडे पाठवीत आहें.

इ. स. १९२५ सालीं माहे जून-जुलै महिन्याची गोष्ट. म्हण आहे कीं, संकट येऊं लागलें म्हणजे तें एकटें कधीं येत नाहीं. त्याची परंपरा असते. त्यावेळीं माझी नोकरी गेली व लगेच पाठोपाठ माझी मुलगीही गेली. नोकरीविषयीं मला विशेष कांहीं वाटलें नाहीं, परंतु मुलगी गेल्यामुळें माझी आणि माझ्या कुटुंबाची स्थिति अत्यंत शोचनीय झाली. ह्या दु:खांत आम्ही आहोंत तों लगेच एक महिना होतो न होतो इतक्यांत त्या मुलीचा मुलगाही गेला. त्यामुळें आमची स्थिति फार बेताल झाली. कुटुंबास तर जवळ जवळ वेड लागलें असेंच म्हणावें लागेल. माझा मुलगा अण्णा भय्या ( आण्णाजी दामोदर रामपूरकर ) हा ११ वर्षांचा, पण तो सुशील व अत्यंत प्रिय बहिणीचे

वियोगामुळें बिमार पडला. अशा वेळीं आमची स्थिति अत्यंत शोचनीय होणें साहजिक आहे.

जवळ पैसा नाहीं. धीर देण्यास कोणी नाहीं. वडील मुलगी सासरीं असून ती बाळंत झालेली. ह्यामुळें मलाही वेडयासारखें होऊं लागलें.

ह्यावेळीं जिरापुरास रा. रा. गणपतराव रेगे हे अमीन होते. माझी जुनी ओळख असल्यानें करमणूक व्हावी म्हणून मी महज त्यांजकडे जाऊन बसलों. तों त्यांनीं मजपाशीं श्रीसाईबाबांची गोष्ट सांगितली. ती सांगत असतां त्यांचें प्रेम अनावर झालें, व जवळ जवळ तीच स्थिति माझी झाली. नंतर मीं त्यांना श्रीसाईनाथाबद्दल माहिती विचारल्यावरून ती थोडक्यांत त्यांनीं सांगितली, व एक मासिकाचा अंक ( श्रीसाईलीला अंक ४ वर्ष ३ शके १८४७ ) मला वाचण्यास दिला.

इ. स. १९१९ सांत मी येथें कोर्टांत हेड क्लार्क होतों. त्यावेळीं रा. रा. अवस्थी जज्जसाहेब जि. राठोड ( हल्लीं उज्जनीस ते प्रांत जज्ज आहेत ) हे जिरापुरास दौऱ्यावर आले होते. त्यावेळीं मजकडे दोन कामें आणखी होतीं. एक त्यावेळीं दत्तसमाज चालू असून दर गुरुवारीं भजन होत असे व दुसरें अनाथ सेवासमिती चालू असून त्याचाही मी प्रेसिडेन्ट होतों.

रा. रा. अवस्थी जज्जसाहेब हे एक पूर्ण भक्त आहेत असें वाटल्यावरून त्यांना गुरुवारीं समाजांत भजनास येण्याबद्दल विनंति केल्यावरून ते आले. त्यावेळीं त्यांचे प्रेमळ भजनावरून माझ्या ठिकाणीं पूज्य भाव बसला. तसेंच ता. १४-११-१९ रोजीं त्यांना सेवासमितीकडून पानसुपारीही झाली. त्यांची माझी समक्ष अशी ओळख नाहीं; व त्यानंतर कधीं बोलणेंही झालें नाहीं. तत्राप माझा अद्याप त्यांच्या ठिकाणीं पूज्यभाव आहे. पुढें मी गरोठला बदलून गेल्यावर त्यांचे संबंधांत बोलणें निघाल्यावरून कळलें कीं, ते शिरडीस कोणी साईबाबा आहेत त्यांचें भजन करीत असतात.

मला रेगेसाहेबांनीं मासिक दिल्यानंतर मी विचारलें कीं, अवस्थी जज्जसाहेब भजन करतात तेच हे साईबाबा काय ? त्यांनीं होय म्हणून

सांगितलें; नंतर मी मासिक घेऊन घरीं आलों व तें कुटुंबास वाचून दाखविलें. त्यावरून मनाला बरीच तळमळ लागली कीं, साईबाबांचें दर्शन कसें होईल? दोनचार दिवसांनीं पुन्हां रेगेसाहेबांकडे गेलों, व आणखी अंक मागूं लागलों. त्यांनीं सांगितलें कीं, आणखी अंक नाहींत पण भक्तविजय आहे, पण तो आम्ही रोज वाचीत असतों. तत्राप त्यांतले कांहीं अध्याय त्यांनीं मला वाचण्यास दिले. तेही आम्हीं वाचले. त्यापासून दु:खी अंत:करणास थोडें समाधान वाटूं लागलें. श्रीसाईबाबांचा फोटो मला अमीन साहेबांनीं दाखविला होता व मासिकाचे अंकावरही तो आहेच.

एके दिवशीं रात्रीं झोंपी जाण्यापूर्वी आम्ही श्रीसाईबाबांना प्रार्थना केली कीं, ' नाथ! आपण सर्वत्र असल्यानें आमची स्थिति आपण पाहात आहांत. आमचें रक्षण करा. ' असें सांगून आम्हीं झोंपी गेलों.

मागील रात्रीं चार वाजतां मला स्वप्न पडलें कीं, श्रीसाईबाबा माझ्या उशागती बसले असून मला नारळ दिला व बोलले, " तूं श्रीज्ञानोबाची भक्ति करितोस तशीच करीत जा; मीही जवळ आहें ना!"

सकाळीं उठल्यावर मला एकदम स्वप्न आठवलें व नारळ पाहूं लागलों. नंतर घरांत गेल्यावर कुटुंबानें मला सांगितलें कीं, " मला आज स्वप्न पडलें. साईबाबा अगदीं फोटोप्रमाणें मला दिसले व म्हणाले, ' अशी फिकर करत जाऊं नये; गेले ते गेले. आहेत त्यांत समाधान मानावें. भिऊं नये. मी जवळ आहें ना? मग काय?"

नंतर मींही माझें स्वप्न सांगितलें व खरोखरीच त्या दिवसापासून आमचे मनांत थोडें समाधान वाटूं लागलें व त्याच दिवशीं पुन्हां साईनाथांची प्रार्थना केली कीं, दु:खानें आमचा जीव पोळला असल्यानें आमचें चित्त स्थिर राहात नाहीं. चि. अण्णा* अद्यापि बिमार आहे. त्यास कधीं बरें वाटेल? त्याला आपल्या पायांवर घातला आहे. सांभाळणार आपण समर्थ आहांत. त्या माऊलीला खरोखर दया आली व त्याच दिवशीं दुपारीं मुलास पुष्कळ बरें

वाटलें व तो ७–८ दिवसांतच बरा झाला. त्यावेळीं ठरल्या प्रमाणें श्रीसाईलीला मासिक वर्ष ४ चैत्र शके १८४८ पासून मुलाचे नांवानें ( अण्णाजी दामोदर रामपूरकर ) या नांवानें आजवर सुरू आहे.

त्यानंतर स्वप्नांत पुन्हां एकदां दर्शन व्हावें म्हणून बरेच वेळां प्रार्थना केली, पण तसा योग आला नाहीं म्हणून वाईट वाटतें.

तुका म्हणे मज बाळपणीं भेटी ॥ आतां जगजेठी दुरावले ॥

म्हणून श्रीसाईबाबांचे भक्तमंडळीस माझी अशी प्रार्थना आहे कीं,

कृपाळू सज्जन तुम्ही संत जन ॥ येव्हढें कृपादान तुमचें मज ॥
आठवण तुम्ही द्यावी पांडुरंगा ॥ कींव माझी सांगा काकुळती ॥
अनाथ अपराधी पतित आगळा ॥ परि पायांवेगळा नका करूं ॥
तुका म्हणें तुम्ही निरविल्यावरी ॥ मग मज हरी उपेक्षीना ॥ १ ॥

ह्याप्रमाणें जर मजवर दया केली तर खास श्रीसाईमाऊली मजवर कृपा करील अशी खात्री वाटते.

श्रुत होय हे विज्ञापना.

आपला नम्र,

ता. ७।१२।३१<br>
कार्तिक वद्य १३.

**दामोदर भगवंत रामपूरकर,**<br>
मुक्काम जिरापूर,<br>
इंदोर स्टेट.

# शके १८५३ च्या श्रीगुरुपौर्णिमेच्या उत्सवाप्रीत्यर्थ वर्गणी देणारांची यादी

| | |
|---|---|
| रा. रा. अजरेकर केशव गणेश, बेळगांव | २०—०—० |
| ,, अजरेकर डी. जे., कुर्डुवाडी | ५—०—० |
| ,, आठवले रघुनाथ बी., पुणें | ५—०—० |
| ,, आंजर्लेकर के. आर., मुंबई | १—०—० |
| ,, आरोळकर आत्माराम लाडोबा, गुंताकल | ५—०—० |
| ,, कर्णिक मोरेश्वर हरी, डहाणू | ५—०—० |
| ,, कानिटकर गणेश आत्माराम, कल्याण | ५—०—० |
| ,, किराणे पुरुषोत्तम महादेव सातारा | ५—०—० |
| ,, किराने महादेव गंगाधर, बिलिमोरा | १—४—० |
| ,, केसरकर वामन सांबा, सावंतवाडी | ५—०—० |
| कु. केळवेकर गुणवंती बाळकृष्ण, वांद्रें | ०—४—३ |
| रा. मा. कोठारी जे. बी. इंदूर | ५—०—० |
| रा. रा. कंटक शामराव भास्कर, मुंबई | २—०—० |
| ,, खडके आत्माराम रामकृष्ण, कलकत्ता | १—०—० |
| ,, खारकर एस्. एस्., खारी | ३—०—० |
| ,, खोत विठ्ठल जगन्नाथ, दादर | १—०—० |
| ,, गवाणकर वासुदेव लक्ष्मण, वसई | १-१२-० |
| ,, गाळवणकर यशवंत जनार्दन, वांद्रें | २—०—० |
| ,, घोलप वासुदेव रामचंद्र, मुंबई | १—०—० |
| ,, चव्हाण एस्. के., मुंबई | १—०—० |
| ,, क्यापटन सर्जन भा. रा. चांदोरकर, भंडारा | १०—०—० |
| रा. रा. चौवळ गंगाधर नारायण, वांद्रें | २—०—० |
| डॉ. चौवळ डी. आर., नांदेड | ५—०—० |

| | | |
|---|---|---|
| रा. रा. | चौबळ एम्. व्ही., चराई—ठाणें | २—०—० |
| श्री. | जयकर सोनाबाई बाळाजी, वांद्रें | २—०—० |
| रा. रा. | जुन्नरकर यशवंत राजाराम, धरमपूर | २—०—० |
| रा. रा. | जोशी आत्माराम नथोबा, अंधेरी | १—४—० |
| ,, | ठाकूर लक्ष्मण दामोदर, बोरिवली | १—४—० |
| ,, | डोळस आनंदराव परशराम, कांदिवली | २—०—० |
| कु. | तर्खड इंदुबाला ज्योतींद्र, वांद्रें | ०—४—३ |
| रा. रा. | तर्खड ज्योतींद्र रामचंद्र ,, | १—४—० |
| सौ. | तर्खड लक्ष्मीदेवी ज्योतींद्र ,, | १—०—० |
| रा. रा. | तर्खड रामचंद्र आत्माराम ,, | ११—०—० |
| ,, | तुंगे सखाराम अनंत | १—४—० |
| ,, | दळवी जनार्दन रामचंद्र, वसई | ३—०—० |
| ,, | दळवी हरी बाळकृष्ण, केळवें | १—०—० |
| ,, | दाभोळकर गजानन गोविंद, वांद्रें | १—०—० |
| ,, | दांडेकर मुकुंद जनार्दन, मुंबई | ५—०—० |
| ,, | देव सदाशिव विश्वनाथ, पौंड | १—०—० |
| ,, | देव रामचंद्र सीताराम, अंधेरी | १—०—० |
| ,, | देवधर व्ही. ए., मुंबई | ५—०—० |
| ,, | देशमुख संपतराव, खरगोण | ७—०—० |
| सौ. | नाईक यशोदाबाई नारायण, सफाळा | १—२—० |
| ,, | नाडकर सोनाबाई विठ्ठल, माहीम | २—४—० |
| रा. रा. | नायक खंडेराव बाळाजी, मुंबई | १—४—० |
| ,, | फागनीस एस. एस., मुंबई | १—०—० |
| ,, | पाटणकर दत्तात्रय नारायण, वांद्रें | १—०—० |
| ,, | पाठारे वसंतराव नानाभाई, दादर | २—०—० |

| | | |
|---|---|---|
| ,, | पितळे विष्णु बळवंत, मुंबई | २—०—० |
| ,, | पेणसे वामन गंगाधर, बडोदें | ५—०—० |
| ,, | पेंडुरकर कृष्णाजी नारायण, कुर्ले | १—४—० |
| सौ. | पेंडुरकर मनोरमाबाई कृष्णाजी, ,, | १—४—० |
| रा. रा. | पोतदार घनश्याम शिवराम | १—०—० |
| ,, | पंडित भिकाजी नारायण, चिपळूण | ५—०—० |
| ,, | ,, वासुदेव नारायण, सावंतवाडी | १—०—० |
| ,, | प्रधान खंडेराव यशवंत, जळगांव | २—०—० |
| रा. रा. | फडकर वामन नारायण, दादर | १—४—० |
| ,, | भगवान शंकर व्ही., पुणें | १—०—० |
| ,, | भांगळे मेघश्याम बाळकृष्ण, सावंतवाडी | २—०—० |
| ,, | भांडारे श्रीधर गणेश, सोलापूर | २—०—० |
| ,, | भोपटकर भिकाजी महादेव | १—४—० |
| ,, | महाजन वासुदेव जीवनजी, मुंबई | ५—०—० |
| ,, | मानकर बाळकृष्ण माधवराव, वांद्रें | २—०—० |
| ,, | मालपेकर कृष्णराव नारायण, मुंबई | ५—०—० |
| ,, | मुणगेकर सदाशिव आप्पाजी हस्तें रा. रा. म. धों. कांबळी, मुंबई | ५—०—० |
| सरदार | मुदलियार एस. सी., पुणें | २—०—० |
| रा. रा. | मुदलियार व्ही. आर., पुणें | १—०—० |
| ,, | मुसाळे बळवंतराव, घोलवड | १—४—० |
| ,, | मुंगी लक्ष्मण गोविंद, नाशीक | १—०—० |
| ,, | मुळे गोविंदराव अमृतराव, माहीम | १—४—० |
| ,, | मेस्त्री हरिश्चंद्र रामजी, अंधेरी | १—०—० |
| ,, | मंत्री पांडुरंग जयराम, मुंबई | ३—८—० |
| ,, | म्हात्रे पांडुरंग जी., अंधेरी | १—०—० |
| कु. | ब्रह्मांडकर शांताबाई, मुंबई | ५—०—० |

| | |
|---|---|
| मे. डी. एम. राजा, मुंबई | २—०—० |
| रा. रा. राजाराम आप्पाराव | १—४—० |
| ,, रामचंद्र गंगाधर भोपाळ | २—०—० |
| ,, राशिनकर शंकर विठ्ठल, नगर | २—०—० |
| ,, रेगे जी. के., खरगोण | ४—०—० |
| ,, शिरोडकर सावळाराम आत्माराम, कुर्ले | २—४—० |
| ,, श्रीयान गोपाळ गणेश, मुंबई | २—०—० |
| ,, सवार नारायण पुंडलीक, बांद्रें | ४—०—० |
| ,, सावंत बाळकृष्ण राघव परडेकर, बांद्रें | २—०—० |
| ,, सामंत वासुदेव सीताराम, मालवण | ३—०—० |
| डॉ. सावे केशीनाथ वासुदेव, मुंबई | १०—०—० |
| रा. रा. सावे मोरेश्वर नारायण, मुंबई | ३—०—० |
| ,, सांबारे दाजी विठ्ठल, पार्ले | ५—०—० |
| ,, सातघरे चिंतामण रामनाथ, बांद्रें | १—४—० |
| ,, वगळ रामकृष्ण नाना, मुंबई | १—४—० |
| कै. वगळ सीताबाई रामकृष्ण, ,, | २—४—० |
| रा. रा. वाडकर यादव मारुती | १—०—० |
| सौ. वालावलकर सीताबाई राजाराम, बांद्रें | १—०—० |
| रा. रा. विजयकर गोवर्धन माधवराव, मुंबई | ३—०—० |
| ,, विजयकर खंडेराव माधवराव ,, | ३—०—० |
| ,, विनायक शंकर गिरधर, अंधेरी | २—०—० |
| ,, वैद्य विनायक आप्पाजी ,, | २—०—० |
| | २६०—६—६ |